**आर.सी.सी क्र.७९०/२०२५**

सरकार विरुध्द मिर अकबर अली
निशाणी क्र. २६३/क लगत

**<u>दि. २१.०४.२०२६ रोजी अभियोग पक्षाचा साक्षीदार क्रमांक–३ श्री. देवलींग राजेंद्र थलपती यांचा पुढील सरतपास शपथेवर सुरु अभियोग पक्षा करीता श्रीमती. राऊत सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वाराः–</u>**

३. मला कपडे शिवण्यासाठी जे ऑडरफार्म माझ्या कडे येतात त्या ऑर्डर त्याप्रकरणातील माझ्या कडे आलेल्या प्रती मला दाखविल्या त्या त्याच आहे. मी कपडे शिवण्यासाठी जे माप घेतले होते ते मला दाखविलयास ते मी ओळखु शकतो. मी माप घेतलेल्या कागदांच्या प्रती मला दाखविल्या, त्या हयाच आहे. मी हर्षकुमार याचे सर्वप्रथम दहा ड्रेसचे माफ घेतले होते. सदर माप मी दि. २७.०७.२०२४ रोजी घेतले होते. (मा. वकील श्री. बरजे यांनी हरकत घेतली की, मा. सह्हायक सरकारी वकील यांना टिपणाच्या बाहेर काही विचारता येणार नाही). मी बी. के. जीवन, हर्षकुमार, हर्षकुमार वडील, त्याचे भाऊ, इतर नातेवाईक व मित्र यांचे कपडे सन २०२४ मध्ये शिवुन दिले होते. पोलीसांनी या करीता माझा जबाब नोंदविला होता. माझा जबाब २२.०१.२०२५ साली नोंदविला होता. हर्षकुमार हयांचे मी कपडे शिवुन दिले त्याला मी ओळखता. हर्षकुमार हा समोर व्हीडीओ कॉफरनींग द्वारे बघितले असता तो पांढरा टि–शर्ट घातलेला आहे असे साक्षीदाराने सांगितले. मी बी. के. जीवन यांना पाहिल्यास ओळखेल ज्यांचे मी कपडे शिवुन दिले होते ते सुध्दा आज व्हीडीओ कॉफरन्सींग द्वारे हजर असुन ते हेच आहे व त्यांनी आज मरुन रंगाचा टि–शर्ट घातलेला आहे. मी हर्षकुमार याचे वडील अनिल क्षिरसागर यांचे कपडे शिवुन दिले होते त्यांना सुध्दा मी ओळखले. अनिल क्षिरसागर हे आज माझ्या समोर न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

## उलटतपास आरोपी क्र १ तर्फे मा. विधीज्ञ श्री. बरजे

०४. मी टेलर काम करत असल्याचा कोणताही पुरावा आजपर्यंत न्यायालयात दिलेला नाही. हे खरे आहे की, मी टेलर काम करत असल्याचे माझे म्हणणे आहे. त्यासाठी मी पुरावा हजर केलेला नाही. मी सरतपासात मागील तारखेला व आज जे काही सांगितले ते सर्व पोलीसांना सांगितलेले आहे. मी पोलीसांसमोर दिलेला जबाब वाचुन पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या टिपणामध्ये ऑर्डरफॉर्म आम्ही घेतो हे नमुद नाही. मला माझे टिपण दाखविले. या टिपणामध्ये ऑर्डरफॉर्म आम्ही घेतो हे नमुद नाही. या टिपणामध्ये आम्ही माप लिहिलेले कागद घेतो हे नमुद नाही. हर्षकुमार क्षिरसागर यांच्या वडीलाचे नाव माझ्या टिपणामध्ये विशेष नमुद नाही. साक्षीदार सांगतो हर्षकुमार क्षिरसागर यांच्या भावाचे तेज म्हणुन नाव नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, हर्षकुमार क्षिरसागर याला तेज म्हणुन हा भाउ नाही त्यांचे नाव यश आहे. यश यांचे नाव माझ्या टिपणामध्ये आलेले नाही. यश आणि तेज हे एकाच माणसाचे नाव आहे असेही माझे म्हणणे नाही. जे मी तेज म्हणुन नाव सांगितले ते यश नाही. माझे म्हणणे असे आहे की, तेज नावाची व्यक्ती माप दयाला आलेला आहे. यश हा माझ्या कडे माप दयायला आलेला होता असे मला सरतपासात सांगायला कोणी सांगितल नाही. साक्षीदार सांगतो असच आठवल म्हणुन सांगितल. हे म्हणणे खरे आहे की, यश माझ्या कडे कधीही माप दयायला आलेला नाही. मी रंगोली कलेक्शन या दुकानात काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, रंगोली कलेक्शन या दुकानात काम करतो हे दाखव्याला काही कागद हजर केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, रंगोली कलेक्शन मालक/चालक व माझे घनिष्ठ संबंध आहे. हे म्हणणे खरे आहे की, रंगोली कलेक्शन वाल्यांनी काही शब्द टाकला तर मी तो शब्द मोडत नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यांना आवश्यकता असेल तर त्यांना मी मदत करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणताचा टेलरिंगचा व्यवसाय करत नाही.

०५. पोलीसांना सर्व कागद देउन झालेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, टेलरिंग व्यवसाय करण्यासाठीचा परवाना खटल्या कामी हजर नाही. हे म्हणणे खरे

आहे की, सरतपासात असे कोठेही म्हटलेले नाही की, माझ्या कडे टेलरिंग करण्याचा परवाना आहे. मी दि. ११.०८.२०२५ रोजी माप घ्यायला मला बोलवले होते असे पालीसांना सांगितले होते. मी दि. ११.०८.२०२५ रोजी मला माप घ्यायला बोलवले जे काही मला सांगितले ते मी वाचले आहे. मला माझ्या टिपणामध्ये सांगितलेल्या सर्व बाबी नाही यांचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, जे पोलीसांना सांगितल जाईल तेच पोलीस लिहितील. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जबाबात हे माझे म्हणणे बरोबर आहे किंवा चुकीचे आहे असे नमुद नाही. माझ्या जबाबा प्रमाणे हे लोक माप देण्यासाठी माझ्या कडे आले हे लिहिलेले बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, माप घ्यायला मला बोलवले आणि मी गेलो हे जे मी सरतपासात सांगितले ते खोटे आहे.

०६. हे म्हणणे खरे आहे की, मला सर्व बाबी लिहुन ठेवाव्या लागतात. हे म्हणणे खरे आहे की, टेलर हे त्यांचे स्वताचे बुक ठेवतात. हे म्हणणे खरे आहे की, त्या बुक मध्ये जो कोणी ग्राहक येतो त्यांचे पुर्ण नाव, त्याचा मोबाईल क्रमांक व त्यांचे माप त्यामध्ये लिहिली जातात. हे म्हणणे खरे आहे की, पुर्ण नाव व मोबाईल क्रमांक लिहिले जाते ज्यांचे कारण ती व्यक्ती तीच आहे हे समजायला सोपे जाते. मी त्या बुकला व्यक्तीच्या नावा बरोबरच त्यांचे शिवायला आलेले कापडाचे नमुने लावत नाही. साक्षीदार सांगतो की, त्या बुक मधील कागदाचा भाग त्या कापडाला लावतो. महिन्याला माझ्याकडे पाच ते सहा बुक भरतात, ही सर्व माझ्या हस्ताक्षरात असतात. हे म्हणणे खरे आहे की, हा सर्व अभिलेख वर्षाचा मी संभाळतो. मी आयकर भरतो. जे काही ग्राहक आमच्याकडे आलेला असेल त्याला त्यांचे कापडे शिवुन कधी मिळेल व त्यांचे माप, त्याची झालेली शिवण्याची रक्कम हे सर्व नमुद करुन त्याला त्यांनी दिलेल्या कापडाचा नमुना लावुन त्या ग्राहकाला दिला जातो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासात व जबाबात माझे असे काही म्हणणे नाही की, मी विशिष्ट दुकानासाठी काम करतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे असे कोठे ही म्हणणे नाही की, मी वेगवेगळी बुक, लोकांसाठी व दुकानासाठी ठेवतो. मी सर्वांसाठी एकच बुक ठेवतो. हे म्हणणे खरे आहे की, ग्राहकांच्या कापडाचा नमुना हे शिवन काम करणारे त्यांच्याही बुक मध्ये लावतात. हे म्हणणे खरे आहे की, जर एखादा कपडा

हरवला तर तो मिळण्याचा काही प्रश्नच नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी टेलरच नाही, कारण टेलरींग व्यवसायातील ज्या परंपरागत गोष्टी असतात त्या मी पाळत नाही. मला टेलरींग व्यवसायातील हा महत्वाचा नियम कापड नमुना बुकला लावण्याचा मी पाळत नाही यांचे कारण मला काही सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ग्राहकाला बिल नको आहे व कोठेही हिशोब दाखवयचा नाही त्यांच्या बाबत कोणतेही नियम पाळले जात नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला कोठेही बील नको असल्यास तेथे मी हा नियम पाळत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी असे कोठेच म्हटले नाही की, आरोपींनी मला बिलच मागितले नाही अथवा मी त्यांना बीलच दिले नाही.

०७. हे म्हणणे खरे आहे की, सध्या मोठी मोठी दुकाने सर्व ठिकाणी निर्माण झाली आहे व जेथे तयार कपडे मिळतात व छोटे मोठे शिवण विषयीचे जे काही काम असेल ते करुन दिले जाते. हे म्हणणे खरे आहे की, एखादयाकडे भरपुर पैसे असेल तरे तो कपडे शिवुन घेण्याचा भानगडीत पडत नाही तो रेडीमेड कपडे घेतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींना माझ्याकडे रंगोली कलेक्शने पाठविले याचा कोणाताही आधार नाही. हे म्हणणे खरे आहे की, रंगोली कलेक्शनचे मालक अथवा चालक यांनी मला जे सांगायला सांगितल तेच मी पोलीसांना व न्यायालयात सांगितले. सन २०२४–२५ मध्ये माझ्याकडे ज्या काही वही अथवा बुक भरले ते सर्व मुळ स्वरुपात पोलीसांनी माझ्या कडुन नेले. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या झेरॉक्स प्रती मला आवश्यकता भासल्यास असव्या म्हणुन काढुण ठेवलेल्या आहे. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात साक्ष दयायचा आहे म्हणुन मी त्या वहयांचा अभ्यास करुन आलो आहे. मला हे सांगता येणार नाही की, किती क्रमांचा पानावर किती रुपयाचा व्यवहार आहे हे काही मला सांगता येणार नाही.  मी अभ्यास केला तरी देखील सांगता येणार नाही. मी या व्यवहारा करीता रक्कम रुपये पाच लाख आयकर भरला. आयकर भरल्याचा बाबी काही पोलीसांनी जप्त केलेल्या नाही. हे मला सांगता येणार नाही कि, किती टक्के आयकर भरावा लागतो. साक्षीदार सांगतात की, मी आयकर एक रकमी भरतो. मी माझे लेखापरिषक भुषण पुर्ण नाव सांगता येणार नाही यांनी आयकर रक्कम काढुन दिल्यानंतर भरतो. त्यांचा पत्ता मला सांगता येणार

नाही पण ते मा. उच्च न्यायालयाचा पाठीमागे रहतात. मी आयकर भरल्याची पावती न्यायालयात हजर करु शकणार नाही. हे म्हणणे खरे नाही की,मी कोणतेही काम करत नाही तसेच कोणताही आयकर भरत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सरतपासात कापडाचे विशिष्ट ब्राण्ड सांगतले त्याला कोणातही आधार नाही. मला माझे मुळ स्वरुपातील अभिलेख न्यायालयात हजर करता आला नाही त्यांचे कारण व्यक्तीक रित्या काही सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ ला ओळखत नाही अथवा त्याचा मला मोबाईल क्रमांक अथवा त्याचा व्यक्तीक बाबी माहीत नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो की, मी आरोपीला ओळखतो कारण त्यांच मी माप घेतलेले आहे. हर्ष नावाच्या जगात पुष्कळ व्यक्ती असतील. हे म्हणणे खरे आहे की, हर्ष ही व्यक्ती कोण हे जे काही मी सांगतो त्याला माझ्या कडे काही आधार नाही. हे म्हणणे खरे नाही की, जे काही मी सरतपासात सांगीतले ते सर्व खोटे सांगतले आहे.

**आरोपी क्र. १ तर्फे उलटतपास संपला**

**उलटतपास आरोपी क्र २ व ३ तर्फे मा. विधीज्ञ श्री. मुळे यांनी वरील उलटतपास स्वीकारला.**

**उलटतपास आरोपी क्र ४ तर्फे मा. विधीज्ञ श्री. पाटील यांनी वरील उलटतपास स्वीकारला**

**उलटतपास आरोपी क्र ५,६ व ७ तर्फे मा. विधीज्ञ श्री. सीताराम चव्हाण यांनी वरील उलटतपास स्वीकारला.**

**उलटतपास आरोपी क्र ८ व ९ तर्फे मा. विधीज्ञ श्रीमती. एस. पी. माळवदे यांनी वरील उलटतपास नाकारला.**

**उलटतपास आरोपी क्र ८ व ९ तर्फे मा. विधीज्ञ श्री. दळवी माळवदे यांनी वरील उलटतपास नाकारला.**

**पुन्हा फेरतपास घेण्यासाठी मा. सहाय्यक सरकारी वकील यांनी अर्ज दिला. सदरील अर्जावरील आदेश होईल तोपर्यंत पुन्हा सरतपास घ्यायचा किंवा नाही या करीता साक्षीदाराचा पुरावा पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

<table>
<tr><td>समक्ष</td><td>श्रवणोत्तर स्वीकृती.</td></tr>
<tr><td>स्वाक्षरीत/–</td><td>स्वाक्षरीत/–</td></tr>
<tr><td>( श्री. आर. एस. जांबोटकर )</td><td>( श्री. आर. एस. जांबोटकर )</td></tr>
<tr><td>मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद</td><td>मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद</td></tr>
</table>

दिनांक २१.०४.२०२६